# राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांची यादी

## सुनावणी दि.15.01.2015

| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3728/ 2014. | 1. श्री राजेश तुकाराम वाव्हळ, राम मंदिर चौक, वडवणी, जि. बीड. | 2. तलाठी, सज्जा, वडवणी, जि. बीड. | 3. तहसिलदार, तहसिल कार्यालय, वडवणी, बीड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 2 | 3732/ 2014. | 1. श्री सय्यद माजीद हमीद, अंबाजोगाई रोड, केज, जि. बीड. | 2. जन माहिती अधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड. | 3. मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 3 | 3624/ 2014. | 1. श्री किशोर रावसाहेब भोसले, मु.पो. किल्लारी, ता. औसा, जि. लातूर. | 2. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, ता.औसा, जि. लातूर. | 3. विस्तार अधिकारी(पं), पंचायत समिती, औसा, जि.लातूर. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 4 | 3727/ 2014. | 1. श्री अंकूश रामचंद्र चामे, मु.पो. चिखली, ता. अहमदपूर, जि.लातूर. | 2. जन माहिती अधिकारी, उपविभागीय कार्यालय, निलंगा, जि.लातूर. | 3. जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, निलंगा, जि.लातूर. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 5 | 3592/ 2014. | 1. श्री नंदलाल किशनराव लोकडे, 66, मु.पो. चिकना, ता.धर्माबाद, जि.नांदेड. | 2. जन माहिती अधिकारी , नगर परिषद, भोकर, जि. नांदेड. | 3. मुख्याधिकारी, नगर परिषद, भोकर, जि. नांदेड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 6 | 3593/ 2014. | 1. श्री बालाजी पंढरीनाथ थोरात, मु. पाथरड(रेल्वे), पो. मुगट, ता.मुदखेड, जि. नांदेड | 2. अपर पोलिस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड. | 3. पोलिस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परीक्षेत्र, नांदेड. | श्री अंकुशकर | वेळ सकाळी 11.30 वा |
| 7 | 3617/ 2014. | 1. श्री त्रिभुवनसिंह लक्ष्मणसिंह ठाकूर, मु.पो. नागापूर, ता. किनवट, जि.नांदेड. | 2. विस्तार अधिकारी(पं), मग्रारोहयो विभाग प्रमुख, पंचायत समिति, किनवट, जि.नांदेड | 3. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 8 | 3618/ 2014. | 1. श्री दत्ता श्रीकृष्णा सुर्यवंशी, मु.पो. हडसणी, ता.हदगांव, जि. नांदेड. | 2. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड. | 3. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जि. नांदेड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 9 | 3625/ 2014. | 1. श्री व्यंकटरमन बाबुराव ओध्दीवार, साईनगर, किनवट, जि. नांदेड. | 2. जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड. | 3. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 10 | 3682/ 2014. | 1. श्री शेषेराव एकनाथ टेकाळे, मु.पो. कुपटी(मा), ता. माहूर, जि.नांदेड. | 2. वनपरिक्षेत्र अधिकारी, वन विभाग कार्यालय माहूर, जि. नांदेड. | 3. जन अपिलीय अधिकारी, वन विभाग कार्यालय माहूर, जि.नांदेड. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |
| 11 | 3736/ 2014. | 1. श्री उमेश प्रतापराव पैलवान, भवानी रोड, तूळजापूर, जि. उस्मानाबाद. | 2. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, तूळजापूर, जि. उस्मानाबाद. | 3. मुख्याधिकारी, नगर परिषद, तूळजापूर, जि. उस्मानाबाद. | 0 | वेळ सकाळी 11.30 वा |

सहाय्यकाचे नाव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नाव व स्वाक्षरी

| राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांची यादी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सुनावणीचा दि.15.01.2015 | | | | | | |
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 12 | 3671/ 2014. | 1. श्री किसन सिताराम कुलकर्णी(पांडे), कोठाड गल्ली(छल्ला मोहल्ला), अंबाजोगाई, जि. बीड. | 2. तलाठी, सजा तांदुळजा, ता. जि. लातूर. | 3. तहसिलदार, तहसिल कार्यालय, लातूर. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 13 | 3683/ 2014. | 1. श्री शेख मुजीब शेख यासीन, अब्दुल रहीम यांचा वाडा, मासुम कॉलनी, मोमीनपूरा, बीड. | 2. नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, बीड. | 3. तहसिलदार, तहसिल कार्यालय, बीड. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 14 | 3693/ 2014. | 1. श्री मुकर्रमजान गुलमहंमद पठाण, हत्तीखाना गल्ली, बीड. | 2. जन माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड. | 3. शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद, बीड. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 15 | 3708/ 2014. | 1. सौ. आशा चंद्रसेन गायसमुद्रे, वीर पांडूरंग चौक, कसबा विभाग, धारुर जि.बीड | 2. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, धारूर, जि. बीड. | 3. मुख्याधिकारी, नगर परिषद, धारूर, जि. बीड. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 16 | 3529/ 2014. | 1. श्री साबेर हूसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, घर क्रं. 356, समीर एस.टी.डी. जवळ, मोमीनपूरा, परभणी. | 2. सहजिल्हा निबंधक , वर्ग-1, परभणी. | 3. नोंदणी उपमहानिरिक्षक, लातूर विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर,लातूर. | श्री शेख | वेळ दुपारी 03.30 वा |
| 17 | 3550/ 2014. | 1. श्री बाबासाहेब भानुदासराव मुरूंबेकर, श्री मोठा मारुती जवळ, देशमुख गल्ली, परभणी- 401. | 2. नगर अभियंता पाणी पूरवठा, शहर महानगर पालिका, परभणी. | 3. उपायुक्त, शहर महानगर पालिका, परभणी. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 18 | 3572/ 2014. | 1. श्री संजय कांतराव उदावंत, 182, चांडक आर्कीटेक, शिवाजी नगर, परभणी. | 2. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रहम्पुरी, ता. जि. परभणी. | 3. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 19 | 3588/ 2014. | 1. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत/ताडकळस/पुर्णा/ परभणी/पाथरी/ पालम/सोनपेठ/सेलू/ गंगाखेड/जिंतूर, जि. परभणी. | 2. ---------------------. | 3. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी. | मुळ अर्जदार श्री कदम | वेळ दुपारी 03.30 वा |
| 20 | 3603/ 2014. | 1. श्री चंद्रशेखर दिगंबरराव मुळावेकर,गणेश नगर, सेलू, जि. परभणी. | 2. जन माहिती अधिकारी, निम्न दुधना प्रकल्प, सेलू, जि. परभणी. | 3. कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 21 | 3612/ 2014. | 1. श्री. कैलास संतूकराव गडदे, मु. मोहखेड, पो. आडगांव(बा), ता. जिंतूर, जि. परभणी. | 2. जन माहिती अधिकारी, ग्रामीण पाणी पूरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी | 3. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पूरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |
| 22 | 3659/ 2014. | 1. श्री. भालचंद्र रामराव साळुंके, मु.पो. लासूर स्टेशन, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद. | 2. नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद.. | 3. तहसिलदार , तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद.. | 0 | वेळ दुपारी 03.30 वा |

सहाय्यकाचे नाव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नाव व स्वाक्षरी

सुनावणी दिनांक - 15-01-2015.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २३ | ३२२६/२०१४. | १.श्री. गाडे सुग्रीव शिवलींगराव, क्रांतीनगर, तहसिलच्या मागे, बीड. | २. जन माहिती अधिकारी, राज्य शुल्क उत्पादन शुल्क कार्यालय,नगर रोड, बीड. | ३. अधिक्षक, राज्य शुल्क उत्पादन शुल्क कार्यालय,नगर रोड, बीड. | श्री राऊत | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २४ | ३२४८/२०१४. | १. श्री. दिवाकर विश्वनाथराव उरणे, कस्तुरी विश्व, आनंदनगर, अंबाजोगाई जि.बीड. | २. जन माहिती अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, बीड. | ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २५ | २३९५/२०१४. | १.श्री. दामोधर पंडीत ठाकरे, १२ न्यु सुभेदार ले आउट, नागपुर -२४. | २. जिल्हा क्रिडा अधिकारी, जिल्हा क्रिडा कार्यालय परभणी. | ३. उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, कोतवालपुरा, घर नं. ५/२/८८, पानचक्की रोड, औरंगाबाद विभाग औरंगाबाद. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २६ | २३९६/२०१४. | १.श्री. शेख इमदादउलला गुलाम रसुल,बिनबा गेटजवळ,बिनबा वार्ड ५९, चंद्रपुर | २. जन माहिती अधिकारी, महाराट्र राज्य वक्क बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद. | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराट्र राज्य वक्क बोर्ड पानचक्की ता.जि. औरंगाबाद. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २७ | २३९८/२०१४. | १.श्री. सुर्यभान रामचंद्र मुल, एन.आय.टी. कॉटर्स, सी.-५, कपीलनगर, नारी रोड, नागपुर. | २. मुख्य लिपीक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड. | ३.प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २८ | २३९९/२०१४. | १.श्री. तानसेन सुकलाल पारधी, द्वारा- पी.एल.महाले, प्लॉट. नं.२४, पॉप्युलर हौऊसिंग सोसायटी, मनिषनगर, नागपुर. | २. पोलिस उपअधिक्षक (मु.), पोलीस अधिक्षक ग्रामीण कार्यालय, औरंगाबाद. | ३. अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक ग्रामीण कार्यालय, औरंगाबाद. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |
| २९ | २४०१/२०१४. | १.श्री. सारंगधर विश्वनाथ गोळे, प्लॉट नं. ५६, काचीपुरा, नागपुर-४४००१०. | २. जन माहिती अधिकारी, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद. | ३. प्रबंधक (प्रशासकिय),मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद. | ० | वेळ दुपारी ०३.३० वा |

सहाय्यकाचे नाव व स्वाक्षरी                लघुलेखकाचे नाव व

(१)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेश तुकाराम वाव्हळ, : अपिलार्थी
रा. राम मंदिर चौक, वडवणी, जि. बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सज्जा, वडवणी, जि. बीड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, जि. बीड.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३७२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेश तुकाराम वाव्हळ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०७-२०१४ |
| | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०८-२०१४ |
| | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी आयोगापुढे कथन केले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याकरिता आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख देण्यात येत आहे. अधिनियमातील कलम 19 (8) (a) व 19 (7) नुसार आयोगास प्राप्त अधिकारान्वये, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची पुढील सुनावणीस उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद येथे होणा-या सुनावणीसंदर्भातील तपशील www.sic.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

अपील क्रमांक ३७२८/२०१४

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २७.०३.२०१५ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश तुकाराम वाव्हळ, रा. राम मंदिर चौक, वडवणी, जि. बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा, वडवणी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद माजीद हमीद, : अपिलार्थी
रा. अंबाजोगाई रोड, केज, जि. बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर पंचायत, केज, जि. बीड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३७३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-०८-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०९-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, केज शहरातील विकास कामाच्या व इतर खर्चाबाबत दि.०१.०९.२००९ ते दि.०५.०८.२०१४ या कालावधीची खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

" वरील कालावधीत १. केज नगर पंचायत यांनी केलेला जमा खर्च तपशील २. विकास कामाची यादी, गुत्तेदाराचे नांव, कामाचे अंजदापत्रक ३. जागानोंदणी फेरफार नक्कल त्याची संचीका ४. विशेष समिती सभा, सर्वसाधारण सभा, स्थायी समितीसभा ५. ग्रामपंचायत काळात १९९६ ते १९९८ या काळात गडीची रिकामी जागा शाळेसाठी कोणत्या कॉलनाम्याने दिली त्याची सत्यप्रत इत्यादी." (टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे व्यक्तिश: माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते.

अपिलार्थी यांनी विविध विषयांवर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ अन्वये अपिलार्थीस केवळ एका विषयावर (१५० शब्दात) माहिती अनुज्ञेय होते. यानुसार अपिलार्थीस पहिला विषय म्हणजे केज नगर पंचायतीने केलेला जमाखर्चाचा तपशील देय होत आहे. यास्तव अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम 7(9) नुसार पहिल्या विषयाच्या माहितीची पाहणी देणे उचित ठरत आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, जन माहिती अधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ची माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 2 (j) तरतुदीप्रमाणे माहितीच्या अधिकाराचा वापर करण्यामध्ये विविध पर्यायांचा समावेश आहे. यामध्ये पहिला पर्याय म्हणजे माहितीची पाहणी करणे, हा होय, माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असा त्याचा अर्थ होतो. अशी माहितीची पाहणी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार (दुसरी सुधारणा) नियम, २०१२ नुसार व्यक्तिशः अनुज्ञेय राहील. अपिलार्थी पाहणीच्या वेळी टिपणी/टाचण इ.नोंदीच्या स्वरुपात माहिती हस्तगत करु शकतात. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड.यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्र.१ ची माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. यासंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करण्यात यावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ, औरंगाबाद

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** १५-०१-२०१५

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द.रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद माजीद हमीद, रा. अंबाजोगाई रोड, केज, जि. बीड.

२. जन माहिती अधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

(3)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर रावसाहेब भोसले, : अपिलार्थी
मु. पो. किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औसा, जि. लातूर.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०५-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०७-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | : - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, जुन २०१३ ते मे २०१४ या कालावधीची खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१.ग्रामपंचायत किल्लारी- मासिक बैठक ठराव रजिस्टरच्या छायांकित प्रती २. मासिक बैठक नोटीस रजिस्टरच्या छायांकित प्रती." (टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम 7(9) नुसार त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी देणे उचित ठरत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे कळवून अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी त्यांना उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती (५० ते ६०पृष्ठे) विनामूल्य द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, ता. औसा, जि. लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती (५० ते ६०पृष्ठे) विनामूल्य द्याव्यात. यासंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करण्यात यावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. केहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर रावसाहेब भोसले, मु. पो. किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.
२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, ता. औसा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औसा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

(४)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अंकूश रामचंद्र चामे, मु. पो. चिखली, ता. अहमदपूर, जि. लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, निलंगा, जि. लातूर. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी, निलंगा, जि. लातूर. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३७२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, निलंगा, जि. लातूर- श्री. पांचाळ एम. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, निलंगा, जि. लातूर-डॉ. अनंत गव्हाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०६-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०१-२०१५ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"उप विभागीय अधिकारी, निलंगा यांना दि.१२.०२.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांनी जा.क्र.२०१४/आस्था/कक्ष-३/कावी-१२६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी, उदगीर यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे या बाबत चौकशी करण्याचे आदेश पत्र दिले आहे त्याप्रमाणे चौकशी करुन जिल्हाधिकारी, लातूर यांना पाठवलेल्या चौकशी अहवालाची प्रत देणे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही कथन केले की, सदर प्रकरणात अंतिम चौकशी पुर्ण झालेली नाही. चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच माहिती उपलब्ध नसल्याने याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, लातूर यांना पाठविण्यात आलेला नाही.

अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार झालेल्या चौकशी अहवालाची माहिती मागितलेली आहे. तथापि चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. त्यामुळे कलम 8(1)(h) नुसार सदरची माहिती अपिलार्थीस देय होणार नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** १५-०१-२०१५

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकूश रामचंद्र चामे, मु. पो. चिखली, ता. अहमदपूर, जि. लातूर.
२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, निलंगा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, निलंगा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदलाल किशनलाल लोकडे,<br>रा. ६६, मु. पो. चिकना, ता. धर्माबाद, जि. नांदेड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, भोकर, जि. नांदेड. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, भोकर, जि. नांदेड. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदलाल किशनलाल लोकडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, भोकर, जि. नांदेड- श्री. रामेश्वर शंकरराव वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०५-२०१४ |
| | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०७-२०१४ |
| | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, नगर परिषद, भोकर या कार्यालयाकडून देण्यात येणा-या व्यावसायीक परवानगी बाबत तथा न. प. अस्तित्वात येण्यापूर्वी देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीबाबतची व इतर माहिती विविध १० मुद्यांवर मागितलेली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते.

त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्रयस्थांच्या घर बांधणी विषयीची माहिती मागितलेली आहे. त्रयस्थांची माहिती मागितलेली असल्याने अधिनियमातील कलम 7(7) व कलम 11 (1) नुसार

त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे ही बाब सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने योग्य ठरते. भविष्यात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना या बाबी विचारात घ्याव्या लागतील.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी दि.०९-०५-२०१४ रोजी माहितीचा अर्ज केलेला आहे. त्यावर त्यांना कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी चार वेळा सुनावणीची नोटीस पाठविलेली आहे. तथापि दरवेळी सुनावणी नोटीस उशिराने मिळालेली आहे. तसेच त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी अद्याप झालेली नाही.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थीस वेळेत सुनावणी नोटीस पाठविलेली होती परंतु अपिलार्थी दिलेल्या पत्यावर उपस्थित नसल्यामुळे ती नोटीस परत आलेली आहे. म्हणून खासदुतामार्फत त्यांच्याशी संपर्क साधून मागितलेली माहिती जास्त असल्यामुळे नेमकी मागावी असे कळविलेले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी काहीही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे आज रोजी माहिती सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निदेशानुसार ती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी त्या माहितीची पाहणी करावी. त्यातील काही माहिती अपूर्ण वाटत असल्यास अपिलार्थी यांनी उर्वरित नेमक्या माहितीकरिता महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम २०१२ अन्वये नव्याने अर्ज करणे उचित ठरत आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

तसेच भविष्यात वर नमूद केल्याप्रमाणे घटना घडू नयेत यासाठी प्रथम अपिलाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याशी नोंदणीकृत टपालाद्वारे पत्रव्यवहार करावा व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्याकरिता दक्ष राहावे असे त्यांना आयोगातर्फे सुचित करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदलाल किशनलाल लोकडे, रा. ६६, मु. पो. चिकना, ता. धर्माबाद, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

(६)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी पंढरीनाथ थोरात, : अपिलार्थी
मु. पाथरवड (रेल्वे), पो. मुगट, ता. मुदखेड, जि. नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परिक्षेत्र,
नांदेड.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी पंढरीनाथ थोरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०८-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०६-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दोन मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१. नरसिंग गणपतराव अंकूशकर, उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर यांच्या सेवा पुस्तीकेच्या पहिल्या पानावरील जातीचा उल्लेख असलेल्या नोंदीची नक्कल न्यायालयीन कामासाठी.

२. सदरील अधिका-याने जात पडताळणी समितीकडे आपल्या कार्यालयामार्फत जात पडताळणीसाठी अर्ज सादर केला असेल तर त्या अर्जाचा दिनांक, जावक क्रमांक तसेच अर्जासोबत जोडलेल्या संपूर्ण प्रमाणीत सत्यप्रती."(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, सदरची माहिती त्रयस्थांची वैयक्तिक स्वरुपाची आहे असे सांगून त्यांना माहिती देण्याचे नाकारलेले आहे. तथापि सेवा पुस्तीकेची प्रत तसेच जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भात दाखल केलेली कागदपत्रे त्यांना आवश्यक आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि.१६.०८.२०१४ रोजी प्रतिसाद देऊन माहिती त्रयस्थांची वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे कलम ८(१) (त्र)(११) नुसार देण्याचे नाकारलेले आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०२.०९.२०१४ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितलेली आहे. त्रयस्थांची माहिती उघड करण्यामागे व्यापक जनहित साध्य होणार असेल तरच अशा प्रकारची माहिती उघड करता येते.

शासनाने विशिष्ट गटातील लोकांसाठी विशिष्ट जागा राखीव ठेवलेल्या त्याचा फायदा त्यांनाच मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली त्रयस्थांच्या जातीसंदर्भातील नोंदीची माहिती उघड करण्यामध्ये व्यापक जनहित आहे असे, आयोगाचे मत आहे.

यास्तव अपिलार्थी यांनी मागितलेल्या पहिल्या मुद्याची त्रयस्थांच्या जातीची नोंद असलेली माहिती इतर माहिती कलम १० अन्वये वगळून अपिलार्थीस पुरविण्यात यावी तसेच मुद्दा क्र.०२ ची माहिती म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्रयस्थांच्या जात पडताळणीसाठी प्रस्ताव गेला असल्यास त्या पत्राचा दिनांक व जावक क्रमांक ही माहिती अपिलार्थीस कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि इतर कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस अनुज्ञेय होणार नाहीत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी पंढरीनाथ थोरात, मु. पाथरवड (रेल्वे), पो. मुगट, ता. मुदखेड, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

(८)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. त्रिभुवनसिंह लक्ष्मणसिंह ठाकूर, : अपिलार्थी
मु. पो. नागापूर, ता. किनवट, जि. नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विस्तार अधिकारी (पंचायत),मग्रारोहयो विभाग प्रमुख,
पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६१७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. त्रिभुवनसिंह लक्ष्मणसिंह ठाकूर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०६-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०८-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, किनवट तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या विहीरीबाबत गट नंबर, काम केलेल्या मजूरांचे नाव व पत्ता, काम केल्याचा अवधी, दिलेली मजूरी रक्कम, अंदाजपत्रकाच्या प्रती, सिमेंट गज इत्यादी माहिती मागितलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अद्याप अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. नेमके एका कामाचे नाव नमूद करुन माहिती मागितलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी वरील बाबी विचारात घेतल्याचे

दिसून येत नाही. अपिलार्थीस विनामूल्य माहिती दयावी असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आहे.

यास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये अंशतः बदल करुन किनवट तालुक्यात रोहयो अंतर्गत झालेल्या विहीरीच्या कामाची संपूर्ण यादी अपिलार्थीस देण्याची जबाबदारी अधिनियमातील कलम 19 (8) (a) व कलम 19 (7) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांच्यावर आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अधिनियमातील कलम 7 (6) नुसार नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच अपिलार्थी यांना माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी योग्य प्रतिसाद दिलेला नाही या बाबी विचारात घेता, या प्रकरणी अपिलार्थी नुकसान भरपाईसाठी पात्र ठरत असल्यामुळे अधिनियमातील कलम 19 (8) (b) नुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांना रु.२०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत रु.२०००/- इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन धनाकर्षा द्वारे (D.D.) अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी, असे त्यांना आयोगातर्फे निदेशित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.
२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नुकसान भरपाईपोटी रु.२,०००/- इतकी रक्कम धनाकर्षाद्वारे (D.D.) पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. त्रिभुवनसिंह लक्ष्मणसिंह ठाकूर, मु. पो. नागापूर, ता. किनवट, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),मग्रारोहयो विभाग प्रमुख, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

(८)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्ता श्रीकृष्ण सूर्यवंशी, : अपिलार्थी
मु. पो. हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड.

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जि. नांदेड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड- श्री. एस. आर. मराठा | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी- श्री. आर. डी. जाधव, वि.अ (पं.), पंचायत समिती, हदगाव | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०९-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"मौजे हडसणी, ता. हदगाव, जि. नांदेड येथील झालेल्या ग्रामसभेची माहिती व विविध ग्राम विकास योजनेअंतर्गत हडसणी येथे किती विकास निधी आला व किती योजनांचे काम पुर्ण झाले

असून किती योजनांचे काम शिल्लक आहे व त्या योजनांचा एकूण किती निधी हडसणी ग्राम पंचायतला देण्यात आलेला आहे." माहितीचा कालावधी सन २०१० ते २०१४ असा आहे.

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकत्रित करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यास्तव आयोगाच्या निदेशानुसार सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामूल्य पाठविण्यात आलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. केहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता श्रीकृष्ण सूर्यवंशी, मु. पो. हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हडसणी, ता. हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्यंकटरमन बाबुराव ओध्दीवार, : अपिलार्थी
रा. साईनगर, किनवट, जि. नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड,

| | | |
|---|---|---|
| | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. व्यंकटरमन बाबुराव ओध्दीवार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी- श्री. अरविंद शिवाजीराव मुंढे, मुख्याधिकारी न. प. किनवट | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, सन १९९६-९७ या कालावधीची खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयातील प्रकरण क्र.९६/नपाप्र/टे-२/सिआर-१८३/९६ किनवट नगर परिषदेच्या वतीने अवैध बांधकामास मान्यता दिल्याने भाजी मार्केट येथे लाखो रुपये किंमतीचे नगर परिषदेच्या जागेवर धनदांडगे अतिक्रमण करुन विना परवानगी बांधकाम करीत असल्याबाबत."

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित आहे असे आयोगाचे मत आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती

असते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम 19 (1) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. तदनंतर या प्रथम अपिलाच्या निर्णयावर अधिनियमातील कलम 19 (3) अन्वये दुसरे अपील दाखल करणे अभिप्रेत आहे.

ही बाब विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील प्राप्त अधिकारानुसार आयोगातर्फे अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन आपला निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तदनंतर प्रथम अपिलाच्या निर्णयाविरुध्द अपिलार्थी पुनश्च अधिनियमातील कलम 19 (3) अन्वये आयोगाकडे दुसरे अपील दाखल करु शकतात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.१९-०८-२०१४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

(दी. बा. देशपांडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

औरंगाबाद
दिनांक १५-०१-२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. केहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्यंकटरमन बाबुराव ओध्दीवार, रा. साईनगर, किनवट, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
मु. पो. कुपटी (मा.), ता. माहूर, जि. नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, माहूर, जि. नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, :
माहूर, जि. नांदेड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२-०७-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०७-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, मौजे व ग्राम कुपटी (मा.) ता. माहूर शेत भु. क्र. १५ क्षेत्र १० हे. २४ आर या शेत जमीन क्षेत्रातील ऊभे सागी व गैरीवृक्ष तोड संचिका याबाबत कार्यालयामार्फत झालेली कार्यवाही, वृक्ष संख्या, वृक्षास दिलेले संतक व माल वाहतुकीच्या पासेस बाबत सन १९९८ ते दि.३१.०५.२०१४ या कालावधीची खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१. मौजे कुपटी (मा.), ता. माहूर शेत भु.क्र. १५ वर सागी व वृक्ष तोड करुन मिळणे बाबत शेत मालकाचा अर्ज २. वृक्षतोडी संबंधी शेत मालकानी शेती संबंधी असलेले पुरावा कागदपत्रके जी संचिकेत आहेत ३. वृक्ष तोड संबसंधीचा हुकूमनामा ४. वृक्षाची उभी संख्या बाबत वृक्ष यादी ५. वृक्ष तोड झालेवर वृक्ष तोड यादी ६. तोड वृक्षास संतक प्रदान संबधी हुकूमनामा ७. वृक्षास मारलेल्या संतकाचा क्रमांक ८. सागी व गैरी वृक्षाची अंतीम संख्या ९. वाहतुक पासेस कुठून कुठपर्यंत इत्यादी कागदपत्रके छायांकित प्रतीत मिळणे बाबत."

अपील क्रमांक ३६८२/२०१४

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी कलम 7(1) नुसार विहित मुदतीत दि.०२.०७.२०१४ रोजी खालील प्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

"सदर माहिती आपण सन १९९८ पासून मागितली आहे. परंतु मालकी संदर्भातील दस्ताऐवज पाच वर्षापर्यंत जतन केले जात असल्याने एवढया जुन्या कालावधीतील सदर स. न. चे दस्ताऐवज पुरविण्यात किंवा कागदपत्रे उपलब्ध करण्यास अडचण निर्माण होत आहे."

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेता, अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 7(9) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशा प्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर या सिव्हिल अपील नं-६४५४/२०११ या प्रकरणात दि. ०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे.

यास्तव अपिलार्थी यांनी नेमक्या माहिती करिता महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम २०१२ अन्वये नव्याने अर्ज करणे उचित ठरत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अधिनियमातील कलम 19 (8) (d) नुसार अपिलार्थी यांचे द्वितीयअपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद)

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, मु. पो. कुपटी (मा.), ता. माहूर, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, वनपरिक्षेत्र अधिकारी, कार्यालय, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

(११)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमेश प्रतापराव पैलवान, : अपिलार्थी
रा.भवानी रोड, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३७३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, तुळजापूर, जि. उस्मानाबाद- श्री. अशोक वै. सनगले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-०८-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थितीत आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१. तुळजापूर नगरपरिषदेच्या हद्दीत नगरपरिषद तुळजापूर यांच्यासाठी राखीव सर्वे नंबर लहान/मोठया जागांची चौरसमीटर मध्ये वार्डनिहाय माहिती.

२. महाराष्ट्र शासनाकडून नगरपरिषद तुळजापूर यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या खुल्या जागांची माहिती तपशिलवार सिटी सर्वे नं./नगरपरिषद घर नंबर, चौरस मीटर मध्ये व सत्य प्रतित.

३. संबंधित जागा खुल्या आहेत किंवा बांधकाम केलेल्या आहेत, कोणत्या ठिकाणी आहेत व त्यावर अनाधिकृत अतिक्रमण झालेले आहे किंवा कसे याची तपशिलवार माहिती देण्यात यावी.

४. नगरपरिषद तुळजापूर यांच्या मालकीच्या जागेवरती अतिक्रमण करणा-या व्यक्तिवर कारवाई करण्यात आली आहे काय याची माहिती तसेच आजतागायत कारवाई करण्यात आलेल्या व्यक्तिंची नावे तपशिलवार माहिती." माहितीचा कालावधी सन २०१३-२०१४ असा आहे. (टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी यांनी विविध विषयांवर माहिती मागितलेली आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ अन्वये अपिलार्थीस केवळ एका विषयावर (१५० शब्दात) माहिती अनुज्ञेय होते.

यास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एका विषयांवर १० पृष्ठांची माहिती दि.१४.०८.२०१४ रोजी पाठविलेली आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. ही बाब विचारात घेता, आयोगाच्या निदेशानुसार अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा एकदा माहिती पाठविण्यात आलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** १५-०१-२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमेश प्रतापराव पैलवान, रा.भवानी रोड, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.
२. जन माहिती अधिकारी, नगर अभियंता, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

(१२)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किसन सिताराम कुलकर्णी (पांडे), : अपिलार्थी
रा. कोठाड गल्ली (छल्ला मोहल्ला), अंबाजोगाई, जि. बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सज्जा तांदुळजा, ता. जि. लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री. गणेश किशनराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सज्जा तांदुळजा, ता. जि. लातूर, श्री. सुर्यवंशी एस. एन. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मंडळ अधिकारी, तांदुळजा, मंडळ विभाग, तांदुळजा, ता. जि. लातूर, श्री. शेख एन. ए | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०३-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०५-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. दोनही बाजुचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"तलाठी कार्यालय सजा तांदुळजा ता.लातूर, अर्जदाराच्या वडीलांचे नावे मौजे कानडी बोरगाव ता.लातूर येथील असलेली वडीलोपार्जित शेतजमीन सर्वे नं.५२२ ब व सध्याचा गट क्र.१०२ मधील क्षेत्रफळ ६ हे. ३१ आरची सन १९७४ ते १९९३ पर्यंतची सातबारा उतारामधील फेर फार क्र.१ फोडवाटणीची माहिती, अर्जदाराचे वडील श्री.सिताराम रामचंद्र कुलकर्णी यांच्या मृत्यूनंतर दि.१२.०८.१९७३ रोजी वारसाहक्काने त्यांचे नावे मौजे कानडी बोरगाव ता.लातूर येथील

शेतजमिनीवर सर्वे नं.५२ (२ ब) वर फेरफार क्र.१३४ नुसार ६ हे ३१ आर क्षेत्रफळावर वारस म्हणून किशन कुलकर्णी, उध्दव कुलकर्णी, माधव कुलकर्णी यांची नोंद घेण्यात आली होती. त्या नंतर १९७४ ते १९९३ च्या कालावधीत गट नं.१०२ च्या सातबारा उतारा फेर फार क्र.१ अन्वये १. किसन कुलकर्णी २ हे., २.उध्दव कुलकर्णी २ हे., ३. माधव कुलकर्णी २ हे.३१ आर अशी तिघांची नावे नोंद लागलेली होती. सदर फोड ही कुठल्या कागदपत्राच्या आधारे सातबारा उताऱ्यावर नोंदविण्यात आली. ती लावताना कागदपत्राच्या प्रक्रियेनुसार फेर घेतलेला असावाच त्या पूर्ण प्रक्रियेसह फेर फार नकलेची व मूळ कागदपत्रांच्या (संचिका) छायांकित प्रति व माहितीची आवश्यकता आहे."

(टिप :- अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामधील मजकूर जसास तसा घेण्यात आलेला आहे)

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयामध्ये शोध घेऊनही ती उपलब्ध झाली नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी सन १९७४ ते १९९३ असा आहे. या कालावधीमधील अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध असू शकते. म्हणून अशा माहितीचा तहसील कार्यालयामधील अभिलेख कक्षामध्ये शोध घेण्यात आला. तथापि माहिती उपलब्ध झालेली नाही. फेरफारच्या संदर्भातील साधारणतः पाच वर्षापर्यंतचे अभिलेखे तलाठी कार्यालयाकडे उपलब्ध असतात व पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीचे अभिलेखे तहसील कार्यालयाकडील अभिलेख कक्षामध्ये जमा केलेले असतात. त्यामुळे अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षाकडून उपलब्ध होऊ शकते. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात आणखी काही कालावधी उपलब्ध करुन दिल्यास अशा माहितीचा शोध घेऊन ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता येणे सोईचे होईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम 19 (8) (a) व 19 (7) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आयोगातर्फे तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी. अशी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना प्रतिसाद देण्यात यावा या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध

घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी. अशी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना प्रतिसाद देण्यात यावा.

**(दीं. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** **१५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किसन सिताराम कुलकर्णी (पांडे), रा. कोठाड गल्ली (छल्ला मोहल्ला), अंबाजोगाई, जि. बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा तांदुळजा, ता. जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, तांदुळजा मंडळ विभाग, तांदुळजा, ता. जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख मुजीब शेख यासीन,<br>रा. अब्दुल रहीम यांचा वाडा, मासुम कॉलनी, मोमीनपुरा,<br>बीड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी- | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०६-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी कागदपत्रांसोबत प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत सादर केलेली नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०८.२०१४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नसल्यास आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी यापूर्वी सुनावणी घेतली असेल तर अपिलार्थी यांनी प्रथम अपील निर्णयाच्या प्रतीसह नव्याने द्वितीय अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे सादर करावा. अधिनियमातील कलम 19 (1) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. तदनंतर या प्रथम अपिलाच्या निर्णयावर अधिनियमातील कलम 19 (3) अन्वये दुसरे अपील दाखल करता येऊ शकते. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मधील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

कलम 5 (2) अन्वये द्वितीय अपील अर्ज दाखल करताना त्यासोबत प्रथम अपील निर्णयाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या दि.२०.०८.२०१४ रोजीच्या प्रथम अपिलावर यापूर्वी निर्णय पारित केला नसल्यास, आयोगाचे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** **१५-०१-२०१५**

---

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुजीब शेख यासीन, रा. अब्दुल रहीम यांचा वाडा, मासुम कॉलनी, मोमीनपुरा, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुकर्रमजान गुलमहंमद पठाण, : अपिलार्थी
रा. हत्तीखाना गल्ली, बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७-०७-२०१४ |
| | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०८-२०१४ |
| | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१०-२०१४ |

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी कागदपत्रांसोबत प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत सादर केलेली नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१९.०८.२०१४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नसल्यास आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी यापूर्वी सुनावणी घेतली असेल तर अपिलार्थी यांनी प्रथम अपील निर्णयाच्या प्रतीसह नव्याने द्वितीय अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे सादर करावा. अधिनियमातील कलम 19 (1) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. तदनंतर या प्रथम अपिलाच्या निर्णयावर अधिनियमातील कलम 19 (3) अन्वये दुसरे अपील दाखल करता येऊ शकते. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मधील

कलम 5 (2) अन्वये द्वितीय अपील अर्ज दाखल करताना त्यासोबत प्रथम अपील निर्णयाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या दि.१९.०८.२०१४ रोजीच्या प्रथम अपिलावर यापूर्वी निर्णय पारित केला नसल्यास, आयोगाचे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. केहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुकर्रमजान गुलमहंमद पठाण, रा. हत्तीखाना गल्ली, बीड.

२. जन माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. आशा चंद्रसेन गायसमुद्रे, : अपिलार्थी
रा. वीर पांडूरंग चौक, कसबा विभाग, धारुर, जि. बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, धारुर, जि. बीड.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, धारुर, जि. बीड.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३७०८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. आशा चंद्रसेन गायसमुद्रे | : उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी- श्री. चंद्रसेन विठ्ठलराव गायसमुद्रे | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-१२-२०१३ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०५-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या दि.०२.०५.२०१४ रोजीचया प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केलेले आहेत व अधिनियमातील कलम 19 (1) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक

आहे. तदनंतर या प्रथम अपिलाच्या निर्णयावर अधिनियमातील कलम 19 (3) अन्वये दुसरे अपील दाखल करणे अभिप्रेत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांच्या दि.०२.०५.२०१४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील प्राप्त अधिकारानुसार आयोगातर्फे मुख्याधिकारी, नगर परिषद, धारुर, जि. बीड यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०५.२०१४ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नव्याने सुनावणी घेऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दि. ०२.०५.२०१४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. आशा चंद्रसेन गायसमुद्रे, रा. वीर पांडूरंग चौक, कसबा विभाग, धारुर, जि. बीड.
२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिध्दीकी, : अपिलार्थी
रा. घर क्र. ३५६, समीर एस.टी.डी. जवळ, मोमीनपुरा,
परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा :
नोंदणी उपमहानिरिक्षक, लातूर विभाग, जिल्हाधिकारी
कार्यालय परीसर, लातूर.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, परभणी, श्री. एस. के. बोधगिरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१-०७-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०९-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. सह दुय्यम निबंधक वर्ग २ परभणी १ यांचे प्रथम नियुक्ती आदेशपत्र, जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रता व आजपर्यंत किती वेळेस पदोन्नती झाली इ. बद्दल माहिती द्यावी.
२. सदरील कालावधीत त्यांना मिळालेला अतिरिक्त कार्यभार कोणत्या कालावधीत व किती वेळेस मिळाला माहिती द्यावी.

३. सह दुय्यम निबंधक वर्ग २, परभणी यांच्या सेवापुस्तिकेची साक्षांकित प्रत देण्यात यावी.

४. शासकीय कामामध्ये हलगर्जीपणा तसेच बेजबाबदारपणे वागून नियमबाह्य वर्तन केल्याच्या कारणावरुन सेवापुस्तिकामध्ये नोंद करण्यात आली, त्याची प्रत व त्याबद्दल माहिती देण्यात यावी.

(टिप :- अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामधील मजकूर जसास तसा घेण्यात आला.)

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.३१.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, मुद्दा क्र.१ व २ च्या स्वरुपातील माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे, मुद्दा क्र.३ ची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे व मुद्दा क्र.४ च्या संदर्भात कोणतीही नोंद आढळून येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय होते असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.३ व्दारे मागितलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम 8 (1) (j) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. तसेच अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या मुद्दा क्र.४ च्या संदर्भात कोणतीही नोंद नसल्यामुळे अशी माहिती निरंक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग १, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** **१५-०१-२०१५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

अपील क्रमांक ३५२९/२०१४

प्रमाणित साक्षांकीत प्रत

द.रा.कहार

( द. रा. कहार )

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिध्दीकी, रा. घर क्र. ३५६, समीर एस.टी.डी. जवळ, मोमीनपुरा, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरिक्षक, लातूर विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबासाहेब भानुदासराव मुरुंबेकर, : अपिलार्थी
रा. श्री. मोठा मारुती जवळ, देशमुख गल्ली, परभणी-४०१.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर अभियंता, पाणी पुरवठा, महानगर पालिका, परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपायुक्त, महानगरपालिका, परभणी.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबासाहेब भानुदासराव मुरुंबेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी- श्री. शेख इस्माईल, उप अवेक्षक, मनपा, परभणी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -उपायुक्त, महानगरपालिका, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. उबेद चॉउस, प्रशासकीय अधिकारी, मनपा, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०८-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकरी अनुपस्थित आहेत. दोनही बाजुचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१. श्री.शंभरकर आयुक्त असतांना त्यांच्या कार्यकाळामध्ये जलशुध्दीकरण केंद्र पाणी पुरवठा किती रुपये खर्च करण्यात आले.

२. शहरामध्ये किंवा आऊट साईड कडे कोठे लिकेज दुरुस्ती करण्यात आले.

३. लिकेज दुरुस्ती काम कोणत्या व्यक्तीस देण्यात आले ते मान्यता टेंडर धारक होते का."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थी यांनी विविध विषयांवर माहिती मागितलेली आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ अन्वये अपिलार्थी यांना एका विषयावर (१५० शब्दात) माहिती अनुज्ञेय आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी समक्ष उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. आता कोणतीही माहिती उपलब्ध करुन देणे बाकी राहिलेले नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली या बाबत अपिलार्थी आयोगास काहीही सांगू शकलेले नाहीत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

अपील क्रमांक ३५५०/२०१४

प्रमाणित साक्षांकीत प्रत

दराकहार

(द. रा. कहार)

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबासाहेब भानुदासराव मुरुंबेकर, रा. श्री. मोठा मारुती जवळ, देशमुख गल्ली, परभणी-४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगर पालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय कांतराव उदावंत, : अपिलार्थी
रा. १८२, चांडक आर्कीटेक, शिवाजी नगर, परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी, ता. जि. परभणी.

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५७२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| | अपिलार्थी - | : अनुपस्थित |
| | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी, ता. जि. परभणी, श्री. जाधव बी. आर. | : उपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी - | : अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. एस.बी.धाबे, स.ग. वि. अ., पं. स. परभणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०५-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२-०८-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"मौ.ब्रम्हपुरी तर्फे पेडगाव ग्रामपंचायत मधील न.क्र.८ नोंद रजिस्टर व फेर फार रजिस्टर याची छायाप्रत साक्षांकित स्वरुप देणे, सन २०१२-१३ मध्ये केलेल्या फेर फार करिता दाखल दस्ताऐवजाची छायांकित प्रत साक्षांकित करुन देणे"

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.२२.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच आज रोजी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यासाठी सोबत आणलेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी, ता.जि.परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. कहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय कांतराव उदावंत, रा. १८२, चांडक आर्कीटेक, शिवाजी नगर, परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हपुरी, ता. जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी : अपिलार्थी

**विरुध्द**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी. : उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. व्ही. एम. मस्के, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी | : उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी - श्री. बी. एम. कदम, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.३ | अपिलार्थी - श्री. पी. डी. जोशी, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ताडकळस, ता.जि.परभणी | : उपस्थित |
| ३.४ | अपिलार्थी - श्री. रामल के. ए., सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पार्थी, जि. परभणी | : उपस्थित |
| ३.५ | अपिलार्थी - श्री. एल. जी. घोबाळे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सोनपेठ, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.६ | अपिलार्थी - श्री. ए. एन. जाधव, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पालम, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.७ | अपिलार्थी - श्री. डी. बी. धापसे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेड, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.८ | अपिलार्थी - श्री. सी. टी. मुसळे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.९ | अपिलार्थी - श्री. पी. डी. पौळ, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, जि.परभणी | : उपस्थित |
| ३.१० | अपिलार्थी, सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी | |
| ३.११ | अपिलार्थी यांचे विधीज्ञ, श्री.आर.जे.निर्मल | : उपस्थित |

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१२ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.१३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.यु.यादव, कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०७-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी अनुपस्थित आहेत. दोनही बाजुचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, मूळ अर्जदार श्री.ज्ञानोबा प्रभाकर यांनी जन माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे दि.१०.०७.२०१४ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व बाजार समिती आवारात बांधलेले व्यापारी संकुलातील गाळे किती, कुणास वाटप झाले, वाटप पध्दत व पोट भाडेकरु किती, आडत दुकानांची संख्या किती या सर्व बाबतची माहिती द्यावी"

(मूळ अर्जदार श्री.कदम यांच्या माहिती अर्जामधील मजकूर जसास तसा घेतलेला आहे)

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन) संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी मूळ अर्जदार यांच्या दि.१०.०७.२०१४ रोजीच्या माहिती अर्जास दि.११.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती संबंधित कृषि उत्तन्न बाजार समितीशी संबंधित असल्यामुळे सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी यांच्याकडे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे. तथापि संबंधित सर्व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे मूळ अर्जदार यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे दि.०१.०९.२०१४ रोजी प्रथम अपील केलेले आहे. मूळ अर्जदार यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०९.२०१४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, मूळ अर्जदार श्री.कदम यांचे प्रथम अपील मान्य करुन सर्व संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना पंधरा दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थी (सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी) यांनी विचाराधीन व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या विधिज्ञांनी आयोगासमोर कथन केले की, मूळ अर्जदार श्री.कदम यांनी माहितीचा अर्ज जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. या अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन) संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी असे न करता मूळ अर्जदार यांचा माहितीसाठीचा अर्ज सर्व १० कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांकडे वर्ग केलेला आहे. तथापि कृषि उत्पन्न बाजार समितीस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नसल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे सर्व १० कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा ती उपलब्ध करुन देणे त्यांच्यावर बंधनकारक नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार अस्तित्वात येणाऱ्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याबाबतचे निर्णय मा.उच्च न्यायालय व राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी दिलेले आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन व्दितीय अपील मान्य करण्यात यावे अशी विनंती आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, मूळ अर्जदार यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडे उपलब्ध असणारी आहे. त्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना आदेशित केलेले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी मूळ अर्जदार श्री.कदम यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे सादर केलेला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांनी मूळ अर्जदार श्री.कदम यांचा माहितीसाठीच्या अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती प्रथमतः मूळ अर्जदार श्री.कदम यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे. तथापि त्यांनी असे न करता मूळ अर्जदार यांचा माहितीसाठीचा अर्ज सर्व संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितींकडे वर्ग केलेला आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. तथापि सहकारी संस्थांना शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नसल्यामुळे अशा प्रकारच्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नाहीत असे निर्णय यापूर्वी मा.उच्च न्यायालय तसेच राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी दिलेले आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांनी ज्या दहा कृषि उत्पन्न बाजार समितींकडे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज वर्ग केलेला आहे त्या सर्व संबंधित दहा कृषि उत्पन्न बाजार समितीस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा अधिनियमातील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नसल्यामुळे व अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नसल्यामुळे मूळ अर्जदार श्री.ज्ञानोबा प्रभाकरराव

कदम यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी दि.२२.०९.२०१४ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील मान्य करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील क्र.३५८८/२०१४ मान्य करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०१-२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

( द. रा. केहार )
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी
२. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत, जि.परभणी
३. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ताडकळस, ता.जि.परभणी
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पार्थी, जि.परभणी
५. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सोनपेठ, जि.परभणी
६. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पालम, जि.परभणी
७. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेड, जि.परभणी
८. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा, जि.परभणी
९. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, जि.परभणी
१०. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी
११. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
१२. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रशेखर दिगंबराव मुळावेकर, : अपिलार्थी
रा. गणेश नगर, सेलू, जि. परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
निम्न दुधना प्रकल्प, सेलू, जि. परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि. परभणी.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०१-२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प, सेलू, जि. परभणी, श्री. कांदळगांवकर एम.जी. | : | उपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि. परभणी, श्री. सोमवंशी आर. बी. | : | उपस्थित |
| | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०५-२०१४ |
| | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०७-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२२.०५.२०१४ रोजीच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.निदूप्र/लेखा-१/४७६५ दि.निरंक प्रमाणे श्री.कुलकर्णी एम.बी. उप.वि.अभियंता यांचेकडे रु.१५०००/- बाकी होती. त्या बाकीसंदर्भातील हात पावतीची / पावत्यांची प्रमाणित प्रती देण्यात याव्यात ही विनंती."

अपील क्रमांक ३६०३/२०१४

(टिप :- अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामधील मजकूर जसास तसा घेण्यात आलेला आहे)

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.१५.०९.२०१४ रोजीच्या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती कार्यालयामध्ये ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आता दुसरी कोणतीही माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तथापि उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अपिलार्थी यांना चुकीची व अपूर्ण वाटत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. या प्रकरणी जी माहिती उपलब्ध आहे ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये अपूर्ण व चुकीची माहिती मिळाली असल्याचे मोघमपणे नमूद केलेले आहे. नेमके नमूद केलेले नाही. ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक** **१५-०१-२०१५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. केहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रशेखर दिगंबरराव मुळावेकर, रा. गणेश नगर, सेलू, जि. परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

२१

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास संतुकराव गडदे, : अपिलार्थी
मु. मोहखेड, पो. आडगाव (बा),
ता. जिंतूर, जि. परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, परभणी

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६१२
२ सुनावणीची तारीख दि. १५.०१.२०१५
३ आज रोजीची उपस्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कैलास संतुकराव गडदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक प्रशासन अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी- श्री. आर. जी. खोतकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८.०१.२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. | ०४.०४.२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १३.१०.२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे ग्रामपंचायत मोहखेडा, ता. जिंतूर जि. परभणी येथील जलस्वराज्य प्रकल्पासाठी प्राप्त झालेला निधी व झालेला खर्च, काम पूर्ण करण्याचा दिनांक, काम अपूर्ण राहण्याची कारणे तसेच प्रकल्पासंबंधीची सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स - अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस एकूण २५९ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे दि. ०६.०१.२०१५ रोजी पाठविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झाली आहे, असे युक्तिवादात कथन केले. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास संतुकराव गडदे,मु. मोहखेड, पो. आडगाव (बा),ता. जिंतूर, जि. परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

(२२)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

: अपिलार्थी

श्री. भालचंद्र रामराव साळुंके,
मु.पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर,
जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म),
तहसील कार्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३६५९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५.०१.२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भालचंद्र रामराव साळुंके | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद- श्रीमती अनिता भगवानराव कोलगने | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद - श्री. प्रविण ज्ञानु पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०६.२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.०७.२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.१०.२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे - सन २०१२ ते दि. २७.०६.२०१४ या काळात श्री. सुभाष ज्ञानदेव साळुंके व त्यांचे वारसदार रा. मांजरी- माहुली यांनी साठवण तलाव जवळ प्रतिबंधीत क्षेत्रात खोदलेल्या विहीरी व इतर बाबी विषयी या पार्श्वभूमीवर विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थी

यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, या साठवण तलावातून गावास पिण्याचे पाणी उपलब्ध होते. तथापि या विहीरीमुळे तलावाची साठवण क्षमता कमी झाली आहे. युक्तिवादात कथन करण्यात आले की, अशाप्रकारची विहीर खोदकाम करण्याकरिता कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडून अर्ज ग्रामपंचायतीस प्राप्त झाले नाहीत व परवानगीही दिलेली नाही. तथापि अशा प्रतिबंधीत क्षेत्रात विहीरी खोदण्यात आल्या किंवा कशा, या बाबींची चौकशी होणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक ठरते, यास्तव प्रभावी प्रशासनाच्या दृष्टीने अधिनियमातील कलम 25(3)(g) अन्वये उचित कार्यवाही करण्याकरिता तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार उपरोक्त युक्तिवादात नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक प्रतिसाद विनामूल्य द्यावा, असे त्यांना आयोगातर्फे निदेशीत करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना अधिनियमातील कलम 25(3)(g) अन्वये उचित कार्यवाही करण्याकरिता शिफारस करण्यात येत आहे.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा.कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भालचंद्र रामराव साळुंके,मु.पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर,जि.औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गाडे सुग्रीव शिवलिंग, : अपिलार्थी
क्रांतीनगर, तहसील मागे, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,
नगर रोड, बीड

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३२२६

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५.०१.२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. ०३.०७.२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"आपल्या कार्यालयातील जवान या पदावर कै. श्री. राऊत संतोष जालींदर यांच्या सेवाकालावधीतील दिनांक ०१.०१.२०१० ते ०९.१२.२०१२ या दोन वर्षातील गैरहजर राहिलेल्या व

त्या कालावधीतील रजा मंजूरीच्या आदेशाच्या सत्यप्रती व त्या कालावधीत त्यांना अदा करण्यात आलेल्या वेतन देयकाचा तपशीलासह छायांकित प्रती देण्यात याव्यात.

वरील कालावधीत कोणत्या रजा मंजूर केल्या त्या आदेशाच्या प्रती व त्या कालावधीतील हजर असलेल्या दै. हजेरीपटाच्या छायांकित प्रतीसह माहिती उपलब्ध करून लवकर देण्यात यावी, ही परत विनंती."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्रयस्थांची आहे. यास्तव अधिनियमातील कलम 11(1) व 8(1)(j) नुसार माहिती देय होणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन (सिव्हील) नं. २७७३४/२०१२ (@ सीसी १४७८१/२०१२) श्री. गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयुक्त व इतर या प्रकरणात दि. ०३.१०.२०१२ रोजी दिलेला निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(वी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गाडे सुग्रीव शिवलिंग,क्रांतीनगर, तहसील मागे, बीड
२. जन माहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नगर रोड, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

३८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिवाकर विश्वनाथराव उरणे,
रा. कस्तुरी विश्व, आनंदनगर,
अंबाजोगाई, जि. बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती, बीड : उत्तरवादी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड :

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३२४८
२ सुनावणीची तारीख दि. १५.०१.२०१५
३ आज रोजीची उपस्थिती
१. अपिलार्थी - श्री. दिवाकर विश्वनाथराव उरणे : उपस्थित
२. जन माहिती अधिकारी - कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पं), जिल्हा परिषद, बीड - श्री. एस. एस. गाडे : उपस्थित
३. जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड - श्री. एन.ए.कुरेशी : उपस्थित
४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २८.०४.२०१४
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख -
६ प्रथम अपिलाची तारीख दि. १८.०६.२०१४
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०.०९.२०१४

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे - आर्थिक वर्ष २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या कालावधीत बीड जिल्हयामधील तालुकानिहाय ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील

दिवाबत्तीची विद्युत देयके भरणा करण्यासाठी शासनाकडून महावितरणला आर्थिक वर्षामध्ये रकमेचा भरणा केला जातो. त्यासंबंधीची माहिती मागितली आहे.

आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सोबत माहिती आणली असल्याचे आयोगासमोर कथन केले. आयोगाच्या निर्देशानुसार माहिती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द.रा.कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिवाकर विश्वनाथराव उरणे,रा. कस्तुरी विश्व, आनंदनगर,अंबाजोगाई, जि. बीड
२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पं), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर पंडीत ठाकरे, : अपिलार्थी
१२, न्यु सुभेदार ले आउट,
नागपूर-२४

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा क्रिडा अधिकारी,
परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक,
क्रिडा व युवक सेवा, कोतवालपुरा,
घर नं. ५/२/८८, पानचक्की रोड,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/२३९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५.०१.२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्रीमती लता लोंढे, क्रीडा अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक,क्रिडा व युवक सेवा, औरंगाबाद - श्री. सी. आर. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२०१२ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. ०३.१२.२०१२ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०६.२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे - महाराष्ट्र सायकल पोलो असोसिएशन, नागपूर व परभणी जिल्हा सायकल पोलो असोसिएशनच्या वतीने राज्य स्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील आयोजित केलेल्या अनेक स्पर्धांच्या संदर्भात विविध ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस दि. १५.०३.२०१३ रोजीच्या पत्राद्वारे मुद्दा क्र. ई बाबतची माहिती यापूर्वीच पाठविली आहे, असे कळविलेले होते व उर्वरित माहितीबाबत त्यांनी सचिव श्री. एम. ए. रिझवान(परभणी जिल्हा सायकल पोलो असो. परभणी) यांच्याकडून घ्यावी, असे कळविले होते. अपिलार्थीस पुनश्च ही बाब दि. ०८.०५.२०१३ रोजी कळविली आहे. तथापि सचिव, श्री. एम.ए.रिझवान, परभणी जिल्हा सायकल पोलो असोसिएशन यांनी दि. ११.०१.२०१३ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या संस्थेने शासनाकडून कोणतेही अनुदान घेतले नसल्यामुळे माहिती देणे बंधनकारक नाही, असा प्रतिसाद दिला आहे. अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या दिलेली आहे. सदर संस्थेस शासनाचे अनुदान प्राप्त होत नाही तसेच शासनाचे भरीव नियंत्रणही नाही. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडे केलेला आहे. अधिनियमातील कलम २(च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. त्यानुसार खाजगी संस्थेची जी माहिती अस्तित्वातील कायद्यानुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती माहिती अपिलार्थीस देय होते. यास्तव त्यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य पाठवावी, असे आयोगातर्फे निदेशीत करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द.रा.कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर पंडीत ठाकरे,१२, न्यु सुभेदार ले आउट,नागपूर-२४

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,क्रिडा व युवक सेवा, कोतवालपुरा,घर नं. ५/२/८८, पानचक्की रोड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इमदादउलला गुलाम रसुल : अपिलार्थी
बिनबा गेटजवळ,चंद्रपूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/२३९६

२ सुनावणीची तारीख दि. १५.०१.२०१५

आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. शेख इमदादउलला गुलाम रसुल : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी - ओव्हर सिअर, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,पानचक्की, औरंगाबाद - श्री. मोहंमद मारूफ : उपस्थित

३.३ जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,पानचक्की, औरंगाबाद : अनुपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१.०५.२०१२

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख -

६ प्रथम अपिलाची तारीख दि. १२.११.२०१२

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७.०९.२०१३ (नागपूर खंडपीठाकडे प्राप्त)
२७.०६.२०१४ (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित विविध १० मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००३ ते डिसेंबर, ११ अशा कालावधीचा असून

माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत मस्जिद, मदरसा, खानकाये यांची नोंदणी प्रमाणपत्रे, अधिकारी व कर्मचारी यांची नावे, पदनामासह पत्यांची माहिती, मस्जिद, दर्गा, खानकाये यांना दिलेल्या मालमत्तांविषयी शासन निर्णय, कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन स्लीप, वक्फ बोर्डच्या अंतर्गत संपूर्ण मालमत्तांचे सातबारा उतारे, मालमत्तांवरी अतिक्रमणाबाबतची माहिती, वक्फ बोर्डच्या झालेल्या सर्व बैठकींमध्ये पास झालेल्या ठरावाच्या छायांकित साक्षांकित प्रती, डिसेंबर, २०११ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती, सन २००३ ते डिसेंबर, २०११ या कालावधीत लावण्यात आलेल्या विवाहाच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती, कार्यालयातील त्रयस्थ माहिती अधिकारी श्री. एस.एन.जाफर यांचेसाठी वैद्यकीय रजा मंजूर करण्यात आलेल्या आदेशाची व त्यांच्या द्वारे रजा मंजूरीकरिता केलेल्या सर्व अर्जांची छायांकित साक्षांकित प्रत या विविध विषयावरील मुद्यांचा समावेश आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहीत मुदतीत दि. ०८.०६.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती मोघम असून विस्तृत व्याप्तीची आहे. त्यातील काही मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही. त्यामुळे अधिनियमातील तरतुदींच्या कक्षेबाहेरील आहे, असा प्रतिसाद दिला आहे.आयोगापुढील कागदपत्रांवरून ही बाब दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी विविध विषय नमूद करून मोघम माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर या सिव्हिल अपील नं-६४५४/२०११ या प्रकरणात दि. ०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय या प्रकरणी विचारात घेणे, आयोगास आवश्यक वाटते.त्याचप्रमाणे महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ अन्वये अपिलार्थीस केवळ एका विषयावर (१५० शब्दात) माहिती अनुज्ञेय होते.

या सर्व बाबी विचारात घेता, अधिनियमातील कलम 19(8)(d) नुसार अपिलार्थी यांचे द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

---

अपील क्रमांक २३९६/२०१४

प्रमाणित साक्षांकीत प्रत

दशाकहार
(द. रा. कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इमदादउलला गुलाम रसुल,बिनबा गेटजवळ,बिनबा वार्ड क्र. ५९,चंद्रपूर

२. जन माहिती अधिकारी तथा ओव्हर सिअर, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तानसेन सुकलाल पारधी, : अपिलार्थी
द्वारा पी.एल.महाले,
प्लॉट नं. २४, पाप्युलर हौऊसिंग सोसायटी,
मनिषनगर, नागपूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उपअधीक्षक (मु),
पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| | अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/२३९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५.०१.२०१५ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१३ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. २९.०५.२०१३ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०६.२०१३ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२०१३ (नागपूर खंडपीठाकडे प्राप्त) २७.०६.२०१४ (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे त्यांच्या स्वतःचे व त्रयस्थ श्री. टी.एस.पारधी यांचे वेतन व कपातीबाबत कालावधी नमूद करून एकूण दोन मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे मागितली आहे.

"१) जानेवारी-१९८७ ते जुलै-१९९८ पर्यंतचे मासिक विवरण

२) जुलै-२००५ ते ऑगस्ट ६/२००७ पर्यंतचे मासिक विवरणपत्र"

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली व दि. २७.०७.२०१३ रोजी निर्णय दिला आहे. यामध्ये खालील बाबींची नोंद घेण्यात आली आहे.

" अपिलार्थी हे त्यांची बाजु मांडण्याकरिता ठेवण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी हजर असल्याने त्यांना शासकीय माहिती अधिकारी, मुख्यालय यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती एकूण ६८ महिन्याची सुनावणीचे वेळी मोफत पुरविण्यात आलेली आहे. तसेच न दिलेली माहिती पो. उप.अ. मुख्यालय यांनी कार्यालय अधीक्षक यांचेकडून १५ दिवसाचे आत हस्तगत करून अर्जदार यांना पुरवून अनुपालन अहवाल सादर करावा."

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे. यास्तव अपिलार्थी यांनी १५ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपूर्ण माहितीबाबत कळवावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अधिनियमातील तरतुदीस अनुसरून नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७(६) नुसार माहिती विनामूल्य पाठवावी, असे आयोगातर्फे निर्देशित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु),पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय,औरंगाबाद वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

(दी. बा. देशपांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

अपील क्रमांक २३९९/२०१४

प्रमाणित साक्षांकीत प्रत

दराकहा

(द. रा.कहार)

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी,द्वारा पी.एल.महाले,प्लॉट नं. २४, पाप्युलर हौऊसिंग सोसायटी,मनिषनगर, नागपूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु),पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

(२९)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सारंगधर विश्वनाथ गोळे, : अपिलार्थी
प्लॉट नं. ५६, काचीपुरा, नागपूर-१०

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुंबई उच्च न्यायालय
खंडपीठ औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रबंधक (प्रशासकीय), उच्च न्यायालय,
खंडपीठ औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/२४०१
२ सुनावणीची तारीख दि. १५.०१.२०१५
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी - उपप्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद - श्री. श्रीनिवास धुं.धोंगडे : उपस्थित
३.३ जन अपिलीय अधिकारी - प्रबंधक (प्रशासकीय), उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद : अनुपस्थित
४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०९.२०१२
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख -
६ प्रथम अपिलाची तारीख दि. २५.१०.२०१२
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १४.०१.२०१३
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७.०६.२०१४

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"(i) The information relates to payment of Court Fees payable in Case of appeal filed u/s 23 of Railway Claims Tribunal Orders. (R.C.T.Act, 1987)

Kindly furnish the information whether Ad valorem Court Fees under Sch. I Art. I are paid in appeals filed against orders passed by Hon. R.C.T. in the High Court Bench at Aurangabad.

(ii) Or Court fees payable is as per Sch. II Article 11."

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 7(1) नुसार विहीत मुदतीत दि.२७.०९.२०१४ रोजी अपिलार्थीस प्रतिसाद देऊन कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम 2(f) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्याचप्रमाणे ही माहिती अधिनियमातील कलम 8 (1) (e) नुयार देय होत नाही. तथापि अपिलार्थी त्यांना आवश्यकता असल्यास न्याय विभागाच्या नियमानुसार (Bombay High Court Appellate Side Rules, 1960) सदरील माहिती प्राप्त करून घेऊ शकतात,असेही कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासकीय), उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.१४.०१.२०१३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. या निर्णयाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील कलम 8 (1) (e) मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्याने देय होणार नाही, असे नमूद करून अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही. यास्तव विचाराधीन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०१.२०१५**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा.कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सारंगधर विश्वनाथ गोळे,प्लॉट नं. ५६, काचीपुरा, नागपूर-१०
२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद